पुढारी MY कोल्हापूर शुक्रवार, २८ जून २०२४

**विवेकानंद कॉलेज**

येथे कराड येथील प्रा. डॉ. ए. जी. थोरात यांचे 'राजर्षी शाहूंचे विचार' या विषयावर व्याख्यान झाले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन झाले. व्याख्यान, वृक्षारोपण करण्यात आले. राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. समीक्षा फराकटे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अस्मिता तपासे यांनी आभार मानले. डॉ. श्रुती जोशी, प्रबंधक आर. बी. जोग उपस्थित होते.

**दादासाहेब मगदूम हायस्कूल**

पुण्य नगरी
शुक्रवार, २८ जून २०२४

# 'विवेकानंद'मध्ये एनसीसी छात्रांचा सत्कार

**कोल्हापूर** : विवेकानंद महाविद्यालय व ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन येथील ऑफिसर छात्र श्रेया देसाई हिची नौदल सेनेमध्ये ऑफिसर ट्रेनिंगसाठी निवड झाली. तसेच ज्युनिअर अंडर ऑफिसर शरयू सुतार, कॉर्पोरल ऐश्वर्या पवार व कार्पोरल सहिता बारसकर यांना कॅडेट वेल्फेअर स्कॉलरशिप मिळाली. त्याबद्दल प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. श्री विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, रजिस्ट्रार आर. बी. जोग यांनी अभिनंदन केले. या छात्रांना लेफ्टनंट जे. आर. भरमगोंडा, कॅप्टन सुनीता भोसले यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.